जावक क्रंमाक १३७४६ /२०२३
कोंढवा पोलिस स्टेशन पुणे शहर
दिंनाक- २०/०९/२०२३

प्रती,
मा. जनसंपर्क अधिकारी सो.
पोलिस आयुक्त कार्यालय, पुणे शहर,
यांना सविनय सादर की,

रिपोर्ट – एम. डी. बेंदुगडे पो. ना. १९६०, कोंढवा पो. स्टे. पुणे शहर
याजंकडुन विंनती पुर्वक की,

विषय – बेवारस मयताची माहीती प्रसिध्दी माध्यमांना कळविणेबाबत

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, कोंढवा पो. स्टे. अकस्मात मयत रजि. नं. २१८/२०२३ सी. आर. पी. सी. १७४ मधिल अनोळखी बेवारस मयत पुरूष, वय अंदाजे ५५ वर्षे, रा. नाव पत्ता माहीत नाही हा दि. ०७/०९/२०२३ रोजी श्री कृपा बिल्डिंग समोर फुटपाथवर, आशीर्वाद चौक, कोंढवा खुर्द, पुणे येथे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने त्यास लगेच पो. हवा. ५४०९ आर. एस. सोंडकर कोढवा पोलीस स्टेशन, पुणे शहर हे स्वःता यादिसह खाजगी ॲम्ब्युलन्सने औषधपोचारासाठी ससुन हॉस्पीटल पुणे घेऊन गेले असता त्यास ससुन हॉस्पीटल मधील डॉक्टरांनी दि. ०७/०९/२०२३ रोजी १०/१५ वा. डॉक्टर तपासणी पुर्वीच मयत झालेचे घोषीत केले. त्याचा एम. एल. सी. नं. २२२४४/२०२३ असा आहे. त्याचे वर्णन खालिलप्रमाणे-



एक अनोळखी बेवारस मयत पुरूष, वय अंदाजे ५५ वर्षे, रा. नाव पत्ता माहीत नाही, चेहरा उभट, रंग काळा सावळा, नाक सरळ, डोकीचे केस पुढील बाजुपासुन मागील बाजुपर्यत टक्कल असुन दोन्ही कानावर पांढरे केस, दाढी व मिशी पांढरी असुन बारीक दिसत आहे, उंची ५ बाय ६ फुट, अंगात कपडे नाहीत.

येणे प्रमाणे वरील वर्णनाचा मयत पुरुष वर नमुद ता. वेळी व ठिकाणी मिळुन आला असुन त्याचे नातेवाईकाचा तपास होणेकामी प्रसिध्दी माध्यमांना कळविणेस विंनती आहे.

मा. सादर व्हावे
दि. २०/०९/२०२३

(पो. हवा. कोंढवा पो. स्टे.)

**मार्फतिने सविनय सादर.**
मा. वरिष्ठ पोलिस निरीक्षक सो.
कोंढवा पो. स्टे पुणे शहर

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोंढवा पोलीस स्टेशन, पुणे